**M.A. (PART-II)**
**MARATHI**
***STUDY OF AN ANCIENT PERIOD***
**(PAPER – II) (JAN-19)**

**Code: 94105 / Marathi - Paper - II- Study of an Ancient Period.**

**[वेळ: ३ तास]** **[गुण: १००]**

**सूचना:** **१. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.**
**२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**

प्र.१ अ) "समकालीन सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय घडामोडींचे प्रतिबिंब समकालीन साहित्य लेखनातून दिसते." या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

ब) बहामन कालीन संतकवींनी तत्कालीन समाजजीवनाला कोणकोणत्या अंगाने नवी दिशा दिली ते साधार लिहा.

प्र.२ अ) संत एकनाथांच्या स्फुट लेखनातून व्यक्त झालेले लोकजीवनाचे पैलू त्यांच्या लेखनाची विविध रूपे साकार करतात" या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

ब) टीपा लिहा.
१. 'रुक्मिणीस्वयंवरातील' रूढी-परंपरा
२. एकनाथी भारुडातील 'रूपके'

प्र.३ अ) "मुक्तेश्वरांची लेखनशैली वैशिष्ट्यपूर्ण असून त्यांच्या लेखनातून समकालीन मानसिकता स्पष्ट होते." या विधानाची साधार चर्चा करा.

**किंवा**

ब) टिपा लिहा.
१. मुक्तेश्वरी "भारतातील' कलामूल्ये
२. 'मुर्खाची लक्षणे' – मधील समाजदर्शन

प्र.४ अ) "संत तुकारामांच्या अभंगातून समकालीन समाजजीवनाचे वास्तवदर्शन घडते" या विधानाचा सोदाहरण परामर्श घ्या.

**किंवा**

ब) टीपा लिहा.
१. तुकारामांच्या अभंगातील - उपदेशपरता
२. तुकारामांच्या अभंगातील – परखडता

प्र.५ अ) "अन्य धर्मियांनी बहामन कालखंडात वैशिष्ट्यपूर्ण व विविधतापूर्ण लेखन केले आहे" या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

ब) टीपा लिहा.
१. नाथपंचकांचे वाङ्मयीन कार्य
२. मुस्लिम कवींची रचना

*********

**61061**

8106B8780CCB67237AB39F5E58BB249E

M.A. (PART-II)
MARATHI
THEORY OF LITERATURE
(PAPER – IV) (JAN-19)

ject Code: 94126 / Marathi - Paper IV- Theory of Literature.

वेळ तीन तास एकूण गुण १००

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्रश्न क्र. १ अ) "साहित्याची एकच एक व्याख्या देता येत नाही": या विधानाची साधक बाधक चर्चा करा.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. प्लेटोचा अनुकृती सिद्धांत
२. ॲरिस्टॉटलचा अनुकृती सिद्धांत

प्रश्न क्र. २ अ) 'आनंद' हेच साहित्याचे एकमेव प्रयोजन आहे का? चर्चा करा.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. साहित्यप्रकारांची विशुद्धता
२. साहित्यिक अभिरुचीची संकल्पना

प्रश्न क्र. ३ अ) साहित्याची निर्मिती आणि आस्वाद या संदर्भातील कल्पनाशक्तीचे कार्य साधार विशद करा.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. सौंदर्यमूल्ये
२. सौंदर्येतर मूल्ये

प्रश्न क्र. ४ अ) साहित्याच्या भाषेसंदर्भात रोमान याकोबसनच्या भूमिकेचा सविस्तर परिचय करून द्या.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. मार्क्सवादाचे स्वरूप
२. वास्तववाद

प्रश्न क्र. ५ अ) रोमँटिसिझमचे विशेष साधार सांगा.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. भारतीय साहित्यशास्त्रातील प्रतिभाविचार
२. नियमोल्लंघन

***************



70BC2C0C91A4FAFC7BD195B46D457CBC

Subject Code: 94152 / Marathi - Paper VI- Applied Criticism

वेळ तीन तास एकूण गुण १००

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
३. प्रश्न क्र. ५ साठी अंतर्गत पर्याय नाही.

प्रश्न क्र. १ अ) समीक्षा व्यापाराची उद्दिष्ट्ये स्पष्ट करून उत्तम समीक्षकाकडे कोणते गुणधर्म असायला हवेत, याची चर्चा करा.

किंवा

आ) साहित्यसमीक्षा प्रक्रियेतील विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन या टप्प्यांचा सविस्तर परिचय करून द्या.

प्रश्न क्र. २ अ) आदिबंधात्मक समीक्षापद्धतीचा थोडक्यात परिचय करून द्या.

किंवा

आ) रूपवादी समीक्षा पद्धतीची सामर्थ्ये व मर्यादा यांचा परिचय करून द्या.

प्रश्न क्र. ३ अ) समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचा सविस्तर परिचय करून द्या.

किंवा

आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कवितांची रूपवादी पद्धतीने समीक्षा करा
१. निवृत्तीदेव म्हणे करितां समाधान- संत नामदेव
२. लक्ष्मणरेषा- पद्मा गोळे
३. तुझं माझं काही नाही- र. कृ. जोशी
४. आपण माणूस म्हणून जन्माला आलो- वसंत गुर्जर

प्रश्न क्र. ४ अ) फ्रॉईड व युंग यांचे सिद्धांत मानसशास्त्रीय समीक्षा करताना उपयुक्त ठरतात: चर्चा करा.

किंवा

आ) ‘वज्राघात’ या कादंबरीची मानसशास्त्रीय समीक्षा करा.

प्रश्न क्र. ५ ‘महानिर्वाण’ या नाटकाची रूपवादी पद्धतीने समीक्षा करा.

--------------

M.A. (PART-II)
MARATHI
DALIT SAHITYA
(PAPER – VIII) (JAN-19)

…ect Code: 94201 / Marathi - Paper VIII- Dalit Sahitya.

[वेळ: ३ तास ] [गुण: १००]

…lease check whether you have got the right question paper.

सूचना: 1. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
2. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्र.१ अ) दलित साहित्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये विशद करा.

**किंवा**

ब) आंबेडकरपूर्व, आबेडकरकालीन व आंबेडकरोत्तर सामाजिक चळवळींचा आढावा घ्या.

प्र.२ अ) ‘सायरनचे शहर’ या कविता संग्रहातील कवितांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**किंवा**

ब) एक प्रांजळ आत्मकथन म्हणून वाट तुडवताना’ या आत्मकथनाचे परीक्षण करा.

प्र.३ अ) ‘शूद्र’ या कादंबरीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये विशद करा.

**किंवा**

ब) दलित साहित्य आणि प्रचलित मराठी साहित्य याविषयी डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या मतांचा परामर्ष घ्या.

प्र.४ अ) ‘परिव्राजक’ या कथासंग्रहाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**किंवा**

ब) ‘निब्बाण’ या नाटकातील संघर्षाची रूपे साधार स्पष्ट करा.

प्र.५ टिपा लिहा: **(कोणत्याही दोन)**

अ) ‘सायरनचे शहर’ मधील प्रतिमा
ब) पत्रकार उत्तम कांबळे
क) ‘परिव्राजक’ मधील सांस्कृतिक संघर्ष
ड) ‘शूद्र’ कादंबरीतील अस्पृश्यता

*************



83DB99DA67FEBBE7D97A1C6B3AE2D8BB

# M.A. (PART-II)
## MARATHI
### *LOK SAHITYA*
**(PAPER – VIII) (JAN-19)**

**[ Total Marks : 100**

**सूचना :**

१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहेत.
**२)** **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. अ) लोकसाहित्य म्हणजे काय सांगून लोकसाहित्याचे स्वरूप व संकल्पना स्पष्ट करा.

**किंवा**

आ) 'लोक आणि लोकसंस्कृती' या संकल्पना स्पष्ट करून त्याआधारे लोकसाहित्याचा विचार कसा करता येईल ते सांगा.

२. अ) लोककथेचा परंपरा व स्वरूपविचार मांडा .

**किंवा**

आ) लोकगीतातील गीतकाव्य व कथाकाव्य यांचे स्वरूप व वैशिष्ट्ये साधार स्पष्ट करा.

३. अ) 'मराठी लोककथा' या कथासंग्रहातील कथांचे आशयविश्व साधार स्पष्ट करा.

**किंवा**

आ) 'मराठी लोककथा' या मध्ये लोककथेची कोणकोणती वैशिष्ट्ये प्रकट झालेली आहेत, ते उदाहरणासहित सांगा.

४. 'रानभूल हे .आदिवासींच्या वास्तव जगण्याची व्यथा मांडणारे नाटक आहे' या विधानाची सत्यता स्पष्ट करा.

**किंवा**

'लोकरंगभूमी'चे स्वरूप स्पष्ट करून त्याआधारे 'रानभूल' या नाटकाच्या संहितेचे परीक्षण करा.

५. लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते या संग्रहातील कोळीगीतांचे स्वरूप व विशेष साधार स्पष्ट करा.

**किंवा**

कोळी लोकगीते ही लोकसमूहाची निर्मिती असून परंपरा ही त्यांची आधारभूमी आहे. या विधानाची साधार चर्चा घडवा.

----------------------------


83DB99DA67FEBBE7D97A1C6B3AE2D658